# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
(Formerly Pune University)

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे – ४११००७
दुरध्वनी क्रमांक : ०२०- २५६२११८८/८९
ई-मेल : affiliation@pun.unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

Academic Section (Affiliation Unit)
Ganeshkhind, Pune -411007
Phone : 020-25621188/89
Email :affiliation@pun.unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्रं. सीए/ १४७६ दिनांक : २८/०९/२०२६

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य/संचालक,
प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित सर्व संबंधित महाविद्यालये

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करिता समाजकार्य अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी करीताचे प्रस्तव नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS PORTAL ) मार्फत सद्यस्थिती सादर न करणेबाबत.

संदर्भ :- १ महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रंमाक: मान्यता- २०२६/ई-७९९६८८/मशि-४, दि. १५-०९-२०२६
२ या कार्यालयाचे परिपत्रक क्रं. सीए/१३७२, दि. १७-०९-२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सन २०२७-२०२८ या शैक्षणिक वर्षापासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये नमूद कार्यपध्दीनुसार 'समाजकार्य' अशी स्वतंत्र विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/अतिरिक्त तुकडी तसेच, अस्त्विात असलेल्या 'समाजकार्य' महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यासंदर्भात शासन निर्णय दि. २७-०८-२०२६ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

परंतु शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी समाजकार्य अभ्यासक्रमासाठी वार्षिक योजना करणेबाबतचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सबब, शासनाकडुन पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत 'समाजकार्य' अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी यांना मान्यता देणेअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये. असे संदर्भिय पत्र क्रं. १ द्वारे कळविलेले आहे.

तरी सर्व पात्र महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ करीता 'समाजकार्य' अभ्यासक्रमासाठी वार्षिक योजना करणेबाबतचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असल्याने शासनाकडून पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत 'समाजकार्य' अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी करीताचे प्रस्ताव नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS PORTAL ) मार्फत सद्यस्थिती सादर करून नयेत.

आपला

( राजेश राहेरकर)
उपकुलसचिव ( संलग्नता कक्ष)

मंत्रालयीन सेवा
महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक 418, चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-32.**

**Email ID:mashi4-hted@mah.gov.in -**

**क्रमांक : मान्यता-2026/ई-799688/मशि-4** **दिनांकः स्वाक्षरीप्रमाणे**

**प्रति,**

कुलसचिव,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषयः** शैक्षणिक वर्ष 2027-28 पासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य अशी स्वतंत्र विद्याशाखा/ नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी तसेच अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी सुरू करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देणेबाबत.

**संदर्भः** शासन निर्णय क्र. मान्यता-2026/ई-799688/मशि-4, दिनांक 27.08.2026 .

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, सन 2027-28 या शैक्षणिक वर्षापासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार 'समाजकार्य' अशी स्वतंत्र विद्याशाखा/ नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी तसेच, अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी कायम विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यासंदर्भात शासन निर्णय दि.27.08.2026 अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

तथापि, वारीलप्रमाणे मान्यता देताना समाजकार्य अभ्यासक्रमाची अनियंत्रित वाढ (Mushroom Growth) होऊ नये याकरिता शैक्षणिक वर्ष 2027-28 साठी समाजकार्य अभ्यासक्रमासाठी वार्षिक योजना तयार करणेबाबतचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. सबब, शासनाकडून पुढील निर्देश प्राप्त होईपर्यंत समाजकार्य अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी यांना मान्यता देणेअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये.